22 MAY 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पर्यावरणप्रेमी, पत्रकारांशी होता संवाद

# कोल्हापूरकरांनी जागवल्या बहुगुणा यांच्या आठवणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चिपको आंदोलनाचे प्रणेते, वृक्षमित्र, ज्येष्ठ पर्यावरणवादी पद्मविभूषण सुंदरलाल बहुगुणा यांच्या निधनाचे वृत्त कळताच कोल्हापुरातील पर्यावरणप्रेमी आणि पत्रकारांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

सुंदरलाल बहुगुणा ऑगस्ट २००० मध्ये तीन दिवस कोल्हापुरात होते. ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी, पत्रकारितेचे विद्यार्थी असताना त्यांची भेट घेणारे राजेंद्र भस्मे, चित्रकलेच्या माध्यमातून संपर्क साधणारे चित्रकार विजय टिपुगडे आणि ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी बहुगुणा यांच्या आठवणी 'लोकमत'शी बोलताना सांगितल्या.कोल्हापुरात ऑगस्ट २००० मध्ये एका कार्यक्रमासाठी आलेल्या सुंदरलाल बहुगुणा यांनी पत्रकारांशी संवाद साधला होता. स्टेशन रोडसमोरील एका माडीच्या घरात त्यांची भेट झाल्याची आठवण ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी यांनी सांगितली. सत्काराच्या निमित्ताने पुष्पहार न घालता फळांचा हार घालावा, अशी सूचना त्यांनी दिल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र भस्मे यांनीही बहुगुणा यांच्या भेटीची आठवण सांगितली आहे. शिवाजी विद्यापीठात १९८९-९० मध्ये बीजेसीच्या तुकडीने मार्च महिन्यात दिल्लीत एक अभ्यास दौरा आयोजित केला होता, त्यावेळी उपपंतप्रधान देविलाल होते. या दौऱ्यादरम्यान १६ मार्च १९९० रोजी एका सायंकाळी पीटीआयच्या कार्यालयात कर्मधर्मसंयोगाने चिपको आंदोलनाचे नेते सुंदरलाल बहुगुणा यांची भेट झाली होती.



कोल्हापुरात औषधी वनस्पतींच्या दुकान उद्घाटनप्रसंगी ऑगस्ट २००० मध्ये सुंदरलाल बहुगुणा यांच्या हस्ते डॉ. मधुकर बाचुळकर यांचा सत्कार झाला होता.

## कलाकार, संशोधकांचे कौतुक

कोल्हापुरात २००० मध्ये एका प्रदर्शनात ज्येष्ठ चित्रकार विजय टिपुगडे यांनी काढलेल्या चित्राचे त्यांनी कौतुक केले होते. त्याच्या आठवणी टिपुगडे यांनी सांगितल्या आहेत. कोल्हापुरात २००० मध्ये झालेल्या एका कार्यक्रमात बहुगुणा यांच्या हस्ते झालेल्या सत्काराची आठवण ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी सांगितली. यावेळी बाचुळकर यांनी जमा केलेल्या २८० औषधी वनस्पतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन बहुगुणा यांनी केले होते. खाणकामविरोधी आंदोलनामुळे बाचुळकर यांचे त्यांनी कौतुक करून स्वहस्ताक्षरातील एक कविता भेट दिल्याचे बाचुळकर यांनी सांगितले. केवळ संशोधन न करता प्रत्यक्ष चळवळीत काम करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी शिक्षकांना केले होते.

लोकमत

# रद्द झालेल्या परीक्षा आजपासून सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यामध्ये उद्भवलेल्या तौक्ते चक्रीवादळ, पाऊस व नैसर्गिक आपत्तीमुळे शिवाजी विद्यापीठाने दि. १७ आणि १८ मे रोजीच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. या परीक्षा आज, शनिवारी आणि उद्या, रविवारी होणार आहेत. विविध १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल शुक्रवारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जाहीर केले.विद्यापीठाच्यावतीने ऑनलाईन स्वरूपात शनिवारी, रविवारी बी.ए. सत्र तीन, बीबीए सत्र पाच आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सत्र एकचे एकूण ५० पेपर होणार आहेत. परीक्षा मंडळाने बुधवारी विविध १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले. त्यामध्ये एम. ई.सत्र एक, एलएलबी तीन वर्षीय सीबीसीएस सत्र एक ते तीन आणि पाच वर्षीय सीबीसीएस एक, दोन आणि चार, सर्टिफिकेट व डिप्लोमा आणि हायर डिप्लोमा कोर्स इन रशियन लँग्वेज, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्स इन जापनिज लँग्वेज, एम. एस्सी, आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

## ३८५० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

विद्यापीठाने बुधवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतली. त्यासाठी एकूण ४८१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३८५० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

पुढारी

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेला ३ हजार ८०० हून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत शुक्रवारी ४ हजार ८१७ पैकी ३ हजार ८५० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. परीक्षा विभागाच्या वतीने ऑनलाईन पद्धतीने २२ मार्चपासून परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारअखेर सुमारे २०० हून अधिक परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. एम.ई.सत्र-१, एलएलबी (तीन व पाच वर्षे) सत्र- १,२,३ व ४, डिप्लोमा कोर्स इन रशियन लँग्वेज, सर्टिफिकेट कोर्स इन जापनीज लँग्वेज, एम.एस्सी.- अल्कोहोल टेक्नॉलॉजी सत्र-३, बी.फार्म सत्र-१ व २, एमबीए सत्र- २ आदी अभ्यासक्रमांच्या २१ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.

पुढारी

# निरंतर संशोधनवृत्तीसाठी शोधनिबंध निर्मिती आवश्यक : डॉ. सलगर

## विद्यापीठात संशोधन कार्यपद्धती विषयावर व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संशोधकांचे संशोधन केवळ पदवीसाठी मर्यादित न राहता संशोधनाची निरंतर वृत्ती विकसित होण्यासाठी शोधनिबंधाची निर्मिती आवश्यक आहे. यातून नवीन ज्ञानाची निर्मिती होईल व आपली संशोधनवृत्ती जोपासली जाईल, असे प्रतिपादन डॉ. सचिन सलगर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे संशोधन पद्धती विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेतील शोधनिबंध तयार करणे या विषयावर ते बोलत होते.

यावेळी प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सलगर म्हणाले, सर्वसाधारणपणे एखादी पदवी मिळविण्यासाठी संशोधन करीत असतो; परंतु असे न करता संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती निरंतर जोपासणे गरजेचे आहे. यासाठी शोधनिबंध तयार करण्याची कौशल्ये आत्मसात करावी. शोधनिबंध वैयक्तिक ज्ञानामध्ये भर घालतीलच; पण यातून सातत्याने नवीन माहिती इतर संशोधकांना उपयुक्त ठरेल. महेश चव्हाण यांनी आभार मानले.



**ऑनलाईन व्याख्यानमालेत बोलताना डॉ. सचिन सलगर.**

22 MAY 2021 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मधुमख्खीयाँ सोचेंगी, ये कौन राक्षस आया है?'

## बहुगुणा यांच्या टिप्पणीला मिळाली होती दाद; 'सकाळ'च्या वर्धापनदिनी साधला होता संवाद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : "मधुमख्खीयाँ सोचेंगी, ये कौन राक्षस आया है? जो हमारे फूल ले गया!"...चिपको आंदोलनाचे प्रणेते सुंदरलाल बहुगुणा यांचे हे वाक्य. 'सकाळ'च्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित रांगोळी प्रदर्शनाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन झाले आणि संयोजकांनी पुष्पगुच्छ देताच विनोदी शैलीत बहुगुणा यांच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले. क्षणात सर्वांच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटली. अशा त्यांच्या विविध आठवणींना आज पुन्हा उजाळा मिळाला.

बहुगुणा यांचे आज निधन झाले. पर्यावरण चळवळीतील खमके नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांचे पर्यावरणविषयक विचार ऐकण्याची पर्वणी कोल्हापूरकरांना सन २००० ला 'सकाळ'च्या वर्धापन दिनानिमित्त मिळाली.

वर्धापन दिनाच्या रंगतदार सोहळ्यात त्यांचे 'पर्यावरण' विषयावर व्याख्यान झाले. सुमारे तासाभराच्या भाषणात पर्यावरण आणि त्याच्या बचावासाठी चाललेल्या प्रयत्नांची ओघवत्या शैलीत त्यांनी मांडणी केली. त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी विद्यार्थी, आबालवृद्धांची झुंबड उडाली होती. विशेष म्हणजे रांगोळी प्रदर्शनात विजय टिपुगडे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची रेखाटलेली रांगोळी त्यांना भावली होती. शाहूराजांनी पर्यावरणावर उत्कृष्ट काम केल्याचा उल्लेख त्यांनी त्या वेळी केला होता. त्या प्रसंगाची आठवण टिपुगडे यांनी सांगितली.





कोल्हापूर : 'सकाळ'च्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन चिपको आंदोलनाचे प्रणेते सुंदरलाल बहुगुणा यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी उपस्थित डावीकडून सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार, प्रा. डॉ. मधुकर बाचूळकर, गणपतराव वडणगेकर, अभिनेते चंद्रकांत मांडरे, तत्कालीन महापौर बाबू फरास. दुसऱ्या छायाचित्रात चित्रकार विजय टिपुगडे यांनी रेखाटलेल्या रांगोळीची पाहणी करताना सुंदरलाल बहुगुणा.

> प्राध्यापक, शास्त्रज्ञ असूनही मी पर्यावरण चळवळीत काम करत असल्याचे त्यांना कौतुक होते. 'सकाळ'च्या वर्धापन दिनानंतर त्यांची पुण्यात भेट घेण्याचा योग आला. शिवाजी विद्यापीठात ते एकदा आले होते तेव्हा त्यांना भेटायला गेलो होतो. त्या वेळी त्यांनी मला अचूक ओळखले. पर्यावरण चळवळीत काम करणाऱ्यांना ते कधीच विसरत नाहीत, असे ते त्या वेळी मला म्हणाले.
> - प्रा. डॉ. मधुकर बाचूळकर



संजय तडसरकर यांनी बनवलेले बहुगुणा यांचे शिल्प.

### तडसरकर यांचे कौतुक

वर्धापन दिनानिमित्त शिल्प प्रदर्शन झाले होते. विशेष म्हणजे शिल्पकार संजय तडसरकर यांनी बहुगुणा यांचे शिल्प केले होते. मातीच्या गोळ्यातून आकाराला आलेल्या शिल्पाचे त्यांना विशेष कौतुक वाटले. त्याबद्दल त्यांनी तडसरकर यांना शाबासकीची थापही दिली.

22 MAY 2021 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ ठरले 'ऑक्सिजन हब'

**८५३ एकर जागेत तब्बल १३ हजार २१७ झाडांची नोंद** | **वार्षिक ७६६.२९ टन ऑक्सिजन वातावरणात** | **१२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांची नोंद** | **पर्यावरणशास्त्र विभागाच्या अभ्यासातील माहिती**

**शिवाजी विद्यापीठाच्या ८५३ एकर जागेत तब्बल १३ हजार २१७ वृक्षांची नोंद झाली असून, वृक्षांकडून वार्षिक ७६६.२९ टन ऑक्सिजन वातावरणात सोडला जात असल्याची माहिती पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या अभ्यासातून पुढे आली आहे. एक वृक्ष दोन नागरिकांना आवश्यक इतका ऑक्सिजन देतो, असे गृहित धरल्यास विद्यापीठातील वृक्ष २६ हजार ४३४ नागरिकांसाठी तारणहार ठरत आहेत.**

**-संदीप खांडेकर**

विद्यापीठ सुदृढ आरोग्यासाठी 'ऑक्सिजन हब' ठरले असून वृक्षांकडून वार्षिक २८७ टन कार्बन डायऑक्साइड शोषून घेतला जातो. विशेष म्हणजे विद्यापीठात १२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांच्या प्रजातींची नोंद झाली आहे. यात सरिसृपांच्या १३, पक्ष्यांच्या ९०, उभयचर ११, सस्तन प्राण्यांच्या एकूण ९ प्रजाती आढळल्या आहेत.

विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने समृद्ध आहे. त्याचे आकर्षण शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, नागरिकांना नेहमीच राहिले आहे. पर्यावरणशास्त्र अधिविभाग व प्राणिशास्त्र अधिविभागाने इथल्या जैवविविधतेच्या अनुषंगाने केलेला अभ्यास महत्त्वपूर्ण ठरला आहे. त्याबाबतची माहिती पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव व प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांच्याकडून मिळाली.

सरिसृप वर्गात सापांच्या एकूण सहा प्रजाती आहेत. तस्कर (कॉमन ट्रिंकेट स्नेक) या दुर्मिळ प्रजातीच्या सापासह सरडे व पालींच्या सहा प्रजाती व कासवाची एक प्रजात येथे आहे.

पक्ष्यांमध्ये थापट्या बदक, शुवई बदक, ब्राह्मणी बदक, छोट्या कंठाचा चिखल्या व स्वर्गीय नर्तक या पाच स्थलांतरित प्रजातींसह तीन स्थानिक स्थलांतरित प्रजाती आढळल्या. गरुडाच्या ही बोनेल्स ईगल व क्रेस्टेड सर्पेंट ईगल या दोन प्रजातींसह अन्य शिकारी पक्ष्यांच्या आठ प्रजाती आहेत. उभयचर प्राण्यांत बेडकांच्या सुमारे दहा प्रजातींचा समावेश असून, बलून फ्रॉग या दुर्मिळ बेडकाची नोंद झाली आहे. सस्तन प्राण्यांत वटवाघळाच्या तीन प्रजातींसह साळींदराची एक प्रजात आढळली आहे.







चिखल्या


कॉमन ट्रिंकेट स्नेक


स्वर्गीय नर्तक

विद्यापीठात आढळणारी जैवविविधता


गरुड


बलून फ्रॉग

> जैवविविधतेचे ज्ञान वाडीवस्तीवर गेले पाहिजे. शालेय विद्यार्थ्यांत त्याबाबत जाणीव जागृती निर्माण करायला हवी. विविध प्रजातींचे जतन, संरक्षण व संवर्धन महत्त्वाचे आहे. दरवर्षी अनेक प्रजाती नष्ट होतात. तणनाशके फवारल्याने प्रजाती लुप्त होण्यास मानव कारणीभूत ठरतो. वृक्ष, पशु, पक्ष्यांच्या प्रजातींच्या संख्या वाढवून त्यांना त्यांच्या अधिवासात सोडणे आवश्यक आहे.
>
> - डॉ. ए. डी. जाधव, सदस्य, राज्य जैवविविधता मंडळ

### जैवविविधतेची नोंद कशी करावी?

महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाकडून नोंदवहीचे पृष्ठांकन (Endorsement) करून घेणे जरूरीचे आहे. जैविक संसाधनाच्या व त्या संबंधीच्या स्थानिक पारंपरिक ज्ञानाच्या व्यावसायिक उपयोगाद्वारे प्राप्त होणाऱ्या फायद्यामध्ये आपली भागीदारी प्रस्थापित करता येईल.

### जैवविविधतेच्या संवर्धनासाठी काय करावे?

ग्रामपंचायत स्तरावर जैविक विविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करावी. जैविक संसाधनाबाबत उपलब्ध स्थानिक पारंपरिक ज्ञानाचा समावेश करता येईल.

### राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण

जैविक विविधता कायदा २००२ ची अंमलबजावणी करण्याकरिता भारत सरकारने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाची स्थापना केली असून, मुख्यालय चेन्नई (तमिळनाडू) येथे आहे.

**विद्यापीठात अधिवास असणाऱ्या वृक्षांच्या प्रजाती**

| | |
|---|---|
| ४ हजार २३५<br>गिरीपुष्प | १ हजार ८५०<br>सुबाभूळ |
| ९५१<br>कडूनिंब | ९०२<br>निलगिरी |

22 MAY 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# संशोधनात आयसीटीचा प्रभावी वापर आवश्यक

## डॉ. खंडागळे : कौशल्य विकास केंद्रातर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : संशोधन करताना फक्त टंकलेखन व इंटरनेटवरून माहिती घेणे म्हणजे संशोधनात तंत्रज्ञानाचा वापर केला असा अर्थ होत नाही. तर संशोधनाच्या प्रत्येक टप्प्यावर आयसीटीचा प्रभावी वापर करण्याची कौशल्ये संशोधकांनी आत्मसात करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने आयोजीत व्याख्यानमालेत ते बोलत होते.

संशोधनातील तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. खंडागळे म्हणाले,



डॉ. खंडागळे

'आज सर्वच क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे होत असल्यामुळे त्या त्या क्षेत्रांनी प्रगती साधली आहे. याचा विचार करून आपण संशोधन करीत असताना आयसीटीचा वापर करून आपले संशोधन क्षेत्र विकसित करण्यासाठी केला पाहिजे. संशोधन समस्येचा शोध घेण्यापासून ते आपले संशोधन इतर संशोधकापर्यंत पोहाचवण्याच्या टप्प्यापर्यंत माहिती व तंत्रज्ञाचा आपण प्रभावी वापर करण्याची कौशल्ये आत्मसात करावीत. समस्या निश्चिती, संशोधन आढावे, माहिती संकलन, विश्लेषण, अहवाल लेखन, सादरीकरण या संशोधनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आपण आयसीटीचा वापर प्रभावीपणे करू शकतो. संशोधनासाठी योग्य संशोधन पद्धती, संशोधनांची साधने, तंत्रे, मांडणी, परीकल्पनांची रचना, करण्यासाठी वापर करणे गरजेचे आहे. संशोधनासाठी आवश्यक अद्ययन करण्यासाठी विविध प्रकारची माहिती संकलित करण्यासाठी, माहितीचे स्त्रोत पाहण्यासाठी, संशोधानासंदर्भात माहितीची देवघेव करण्यासाठी तंत्रज्ञानाची कौशल्ये आत्मसात करणे आज काळाची गरज बनली आहे.'

यावेळी विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक प्रा.डॉ.आर.व्ही गुरव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार महेश चव्हाण यांनी मानले.